Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# दैनिक अतुल्य महाराष्ट्र

आज लक्ष्मीपूजन    शुभ दीपावली

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे |
विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे | बीड महाराष्ट्र | मंगळवार | 21 ऑक्टोबर 2025 | | अंक क्र. 160 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

## दिवाळीत पणती लावण्याचे महत्व

नव चैतन्य, तेज आणि मांगल्याचं पर्व म्हणजे दिवाळी. ही दिवाळीची परंपरा भारतीयांच्या मानसिकतेने पौराणिक संदर्भविश्वात अलगद बसवलेली आहे. मात्र, दीप लावून दिवाळी साजरी करत असतानाच ज्ञानी होऊन ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पेरण्याचा वसा संतविचारांतून भारतीय समाजाला मिळाला. अशा या ज्ञानज्योतीने उजळलेल्या प्रकाशपर्वात सर्वत्र आनंदाचा 'अमृतानुभव' घेता येतो. कारण दिवाळी खेडे आणि शहर असा भेदभाव करत नाही.

भलेही शहरात झगमगाट पाहायला मिळेल, परंतु खेड्यात दिवाळी उत्साहाने ओथंबून येते हे तितकेच खरे. तथापि, यावर्षी दिवाळीच्या निमित्ताने खरेदीचे बेत आखणाऱ्यांच्या वाट्याला काय आले हा तितकाच जिव्हाळ्याचा मुद्दा. दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनलेली महागाई या दिवाळीतही कळीचा मुद्दा ठरली. मने काळवंडून टाकणाऱ्या महागाईतही चैतन्यदायी दीपोत्सव साजरा करण्याच्या उत्साहाला दाद दिलीच पाहिजे. एक मात्र निश्चित की, सुजाण ग्राहक वर्ग यावर्षी चोखंदळ तितकाच सज्ञान झालेला दिसला. वरुणराजाने आखडता घेतलेला हात, त्यामुळे उद्भवलेले दुष्काळाचे सावट, मंदीसदृश वातावरण, जागतिक अर्थकारणात तेलाचे वाढते दर आणि त्यातून रोजच उडणारा महागाईचा भडका अशा बऱ्याच नकारात्मक बाबींनी आसमंत काळवंडलेला आहे.

## आरोग्य आणि शांतीसाठी लक्ष्मीपूजन

पूजेमध्ये लक्ष्मीसोबतच आरोग्य आणि शांतता देणाऱ्या देवतांनाही विशेष स्थान दिले जाते.

**गणेश पूजन:** लक्ष्मीच्या पूजनापूर्वी बुद्धीची देवता श्री गणेशाची पूजा केली जाते. घरात संपत्तीसोबतच ती टिकवण्यासाठी आणि तिचा योग्य वापर करण्यासाठी विवेक आणि बुद्धी असावी लागते. आरोग्यदायी जीवनशैलीसाठी योग्य निर्णय घेण्याची शक्ती गणेश पूजनामुळे मिळते.

**कुबेर पूजन:** धनलक्ष्मीची पूजा संपत्तीचा ओघ वाढवते, तर कुबेर पूजनामुळे संपत्ती घरात स्थिर राहते आणि अनावश्यक खर्च टळतो. पैशाचे व्यवस्थापन शिकण्याचा हा प्रतीक आहे.

**आरोग्याचा संकल्प:** पूजेच्या वेळी 'आरोग्य लक्ष्मी'ची आराधना करून घरात रोगमुक्त वातावरण आणि मानसिक शांतता टिकवण्याची प्रार्थना केली जाते. चांगल्या आरोग्यामुळेच माणूस धनाचा आणि समृद्धीचा उपभोग घेऊ शकतो.

**पूजनाचा मनोवैज्ञानिक परिणाम**

दीपावलीचा सण नकारात्मकता दूर करून सकारात्मकता आणतो. घराची साफसफाई, सजावट आणि दिव्यांचा प्रकाश शुद्धता आणि ऊर्जेची भावना निर्माण करतो. एकत्र बसून लक्ष्मीपूजन केल्याने कुटुंबात एकता आणि सलोखा वाढतो, जो चांगल्या आयुष्यासाठी आवश्यक आहे.



दीपावली विशेष वृत्त : नितीन ढाकणे

## लक्ष्मी पूजन

लक्ष्मी पूजन हा दिवाळी सणांतील सर्वात महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी हिंदू धर्मात धन, समृद्धी आणि ऐश्वर्याची देवी असलेल्या माता लक्ष्मीची पूजा केली जाते.

**महत्व:** हा दिवस धन आणि समृद्धी प्राप्त करण्यासाठी साजरा केला जातो. देवी लक्ष्मी घरात वास करावी आणि वर्षभर सुख-समृद्धी नांदावी यासाठी तिची पूजा केली जाते.

**दिवाळीतील तिसरा दिवस (अमावस्येचा दिवस), जो धनत्रयोदशीनंतर येतो. (२०२५ मध्ये - २१ ऑक्टोबर)**

**पूजा वेळ:** ही पूजा प्रदोष काळात (संध्याकाळ) आणि स्थिर लग्नात (शुभ मुहूर्त) केली जाते, जेणेकरून देवी लक्ष्मी घरात स्थिर राहील.

**पूजन विधी :** स्वच्छता: पूजेपूर्वी घर स्वच्छ केले जाते आणि रांगोळ्या, दिव्यांची सजावट केली जाते.

**कलश स्थापना:** पाणी, सुपारी, नाणी टाकून कलश स्थापन केला जातो.

**देवी-देवता: लक्ष्मी, गणेश, सरस्वती आणि कुबेर यांची मूर्ती किंवा प्रतिमेची पूजा केली जाते.**

पूजा साहित्य: हळद-कुंकू, अक्षता, फुले, दुर्वा, बेलपत्र, नैवेद्य (प्रसाद) अर्पण केला जातो.

नैवेद्य: गोड पदार्थ, विशेषतः दुधाचे पदार्थ आणि धान्याचे (लाह्या) अर्पण केले जाते.

**उद्देश :** संपूर्ण कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी आणि धन-धान्याची वाढ होण्यासाठी प्रार्थना करणे.

लक्ष्मीपूजन करण्याचे मुख्य कारण म्हणजे हिंदू धर्मातील लोकांची माता लक्ष्मी या धन, समृद्धी, ऐश्वर्य आणि भाग्याची देवीवरील अपार श्रद्धा आहे. या पूजेमागे धार्मिक, आध्यात्मिक आणि व्यावहारिक अशी अनेक महत्त्वाची कारणे आहेत.

**धार्मिक आणि पौराणिक कारणे:**

**लक्ष्मीचा जन्म:** पौराणिक कथेनुसार, दिवाळीच्या अमावस्या तिथीला (ज्या दिवशी लक्ष्मीपूजन होते) समुद्र मंथनातून माता लक्ष्मी प्रकट झाली. म्हणूनच हा दिवस तिचा जन्मदिवस मानला जातो आणि तिचे स्वागत करण्यासाठी पूजा केली जाते.

**देवांना संपत्ती मिळाली:** एकदा देवाने आपला पराभव झाल्यावर लक्ष्मीची पूजा करून तिची कृपा प्राप्त केली आणि त्यांचे हरवलेले ऐश्वर्य परत मिळवले. तेव्हापासून लक्ष्मीपूजनाची प्रथा सुरू झाली.

**समृद्धी आणि स्थैर्यासाठी:** धनाचा ओघ आणि स्थैर्य: लक्ष्मी ही 'धन' (पैसा) आणि 'समृद्धी'ची देवता आहे. तिचे पूजन केल्याने घरात आर्थिक स्थिरता (पैसा टिकून राहणे), व्यवसायात भरभराट आणि कुटुंबात सुख-ऐश्वर्य येते, अशी श्रद्धा आहे.

**अष्टलक्ष्मी:** लक्ष्मी ही फक्त पैशाची नाही, तर अष्टलक्ष्मी (८ प्रकारची समृद्धी) देणारी देवता आहे. या पूजेतून लोक आरोग्य, ज्ञान, धैर्य, विजय, धान्य आणि चांगले कुटुंब अशा संपूर्ण समृद्धीची मागणी करतात.

# परळी : लक्ष्मीपूजन व व्यापारपेठेतील भेटीमुळे प्रभाग क्र. ९ ते १७ च्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती उद्या ऐवजी शुक्रवारी

### धनंजय मुंडेंनी प्रभाग क्र. १ ते ८ मधील इच्छुक उमेदवारांच्या स्वतः घेतल्या मुलाखती

### लक्ष्मीपूजन नंतर दरवर्षीप्रमाणे व्यापार पेठेत देणार शुभेच्छा भेटी

**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

परळी नगर परिषदेच्या प्रस्तावित निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेणे सुरू असून उद्या (ता. २१) रोजी होणाऱ्या प्रभाग क्र. ९ ते १७ च्या मुलाखती लक्ष्मीपूजन व त्यानंतर नियमितपणे दिल्या जाणाऱ्या व्यापार पेठेतील शुभेच्छा भेटीच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्यात आल्या असून या मुलाखती उद्या ऐवजी शुक्रवारी (ता. २४) रोजी सकाळी ११ ते पाच या वेळेत विशेष शासकीय विश्रामगृह परळी येथे होतील, अशी माहिती राष्ट्रवादी



काँग्रेस पक्ष परळी यांच्या वतीने देण्यात आली आहे.

आ. धनंजय मुंडे यांनी आज दिवसभर प्रभाग क्र. १ ते ८ मधील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती स्वतः घेतल्या. दरम्यान सध्या दिवाळी सुरू असून उद्या लक्ष्मीपूजन हा अत्यंत महत्त्वाचा सण आहे. तसेच याच दिवशी दरवर्षी धनंजय मुंडे हे परळी वैद्यनाथ शहरातील व्यापार पेठेत भेटी देऊन सर्व व्यापारी बांधवांना शुभेच्छा देत असतात. त्या पार्शवभूमीवर सदरील प्रस्तावित मुलाखती या शुक्रवार पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

दरम्यान उद्या (ता. २१) लक्ष्मीपूजन नंतर धनंजय मुंडे हे सायंकाळी पाच वाजल्यापासून परळी वैद्यनाथ शहरातील व्यापार पेठेत भेटी देण्यासाठी जाणार आहेत, असेही कळवण्यात आले आहे.



# स्वयंपाकघरातील सौंदर्यवर्धना



- हातांची नखे, ओठ यांना दुधाची साय लावावी. साय लावल्यामुळे नखे मऊ राहतात. ओठांना भेगा पडत नाही व ते देखील मऊ होतात.
- दही हे सौंदर्य वाढीसाठी उपयुक्त आहे.त्वचेचे नैसर्गिक आवरण म्हणजेच आम्ल आच्छादन अबाधित ठेवण्यास दही काम करते. यात चंदन/लव्हेंडर/रोज असे सुगंध टाकून त्वचेला लावल्यास तेलकटपणा जाऊन त्वचा उजळते. दही केसांना पण उपयोगी आहे.
- लोणी काढल्यावर एक टेबल स्पून लोण्याने चेहरा, हात , गळा डोळ्याच्या आजूबाजूने मसाज करावा. मसाजची दिशा खालच्या बाजूने वरच्या बाजूला व आतून बाहेर अशी असावी. त्यातही वाळा/गुलाब तेल टाकून सुगंधी करावे.
- साजूक तुपाने तळपाय रात्री चोळावे. हिरड्यांना मसाज करावा. ओठांना लावावे. खूप फायदा होतो. तूप मात्र घरगुती, लोणकढे घ्यावे.

सौंदर्याची काळजी घेणे हे प्रत्येक स्त्रीला मनापासून वाटत असते. प्रथम मुलांची काळजी व नंतर घरातील इतर जणांची काळजी घेताना गृहिणी स्वतःलाच विसरतात. चाळीशी आली की त्वचा, डोळे, केस यांच्या विविध तक्रारी सुरु होतात. ब्युटीपार्लर मध्ये वारंवार जाण्यासाठी वेळ व पैसा दोन्हींची कमतरता जाणवते. पण प्रत्येक गृहिणींच्या हे लक्षात येत नाही की, स्वयंपाकघरातील अनेक पदार्थांचा सौंदर्यवर्धनासाठी खूप उपयोग होतो.स्वयंपाकघरातील पदार्थापासून स्वाद, गंध व शरीर-मनाची तृप्ती करणारे अन्नपदार्थ बनवले जातात. पण आपल्या रूपासाठी वेगळा एकही पैसा खर्च ण करता उपचार होतात. दुध, दही, तूप, मध, विविध भाज्या डाळी इ. पासून स्त्रियांना आपले सौंदर्य जोपासता येते.




## काय करता येईल

सकाळी दुध तापविण्यापूर्वी तीन ते चार टेबल स्पून दुध वातीत काढावे. ह्या दुधाने चेहरा, मान, गळा सर्व ठिकाणी चोळावे. घरगुती क्लिन्झिंग होऊन त्वचा साफ होते. या दुधात हळदीची चिमुट, ज्येष्ठमध, अनंतमूळ , चंदन, गुलाब, खस, मंजिष्ठ, नीम, संत्रासाल, तुळशी, पुदिना यापैकी एक पावडर अर्धा टेबल स्पून टाकून चेहऱ्याला लावावे. हे जमले नाही तर हळकुंड, चंदन इ. सहाणीवर उगाळावे. वाटल्यास त्यात बदाम उगाळावे, किंचित केशर टाकून दुधात मिसळून चेहऱ्यावर, मानेवर हातांना व गळ्याला चोळून लावावे. सुकले की चेहरा चोळून्न धुवावा.




दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

## सावळी त्वचा, नो वे



आपल्या त्वचेवरील सावळी छाया आपल्या सौंदर्याला ग्रहण लावत असते. आपल्या नाजूक व सुंदर चेहऱ्यावरील सावळी छाया दुर करण्यासाठी काही टिप्स...

- लिंबू त्वचेसाठी फारच गुणकारी आहे. याचा प्रयोग वेगवेगळ्या फेसपॅकमध्ये करू शकता.
- दुधाच्या सायीत लिंबाचा रस टाकून तयार झालेली पेस्ट चेहऱ्यावर लावावी. त्यानंतर 10 मिनिटांनी चेहरा गरम पाण्याने धुऊन घ्यावा.
- गुडघे व हाताचे कोपरे जर काळपट पडले असतील तर त्यावर लींबाच्या साली घासाव्यात.
- बिटच्या रसात टोमॅटोचा रस व चिमूटभर हळद मिसळून चेहऱ्यावर लावल्याने काळे डाग नाहीसे होतात.
- द्राक्षाच्या रसात मध टाकून चेहऱ्यावर लावावे.

## झटपट मेकअप करा



ऑफिसमध्ये आपण बराच वेळ राहतो. मात्र मेकअप काही टिकून राहत नाही. त्यातच एखाद्या मीटिंग किंवा पार्टीमध्ये जावे लागले तर झटपट मेकअप कसा करायचा हेदेखील लवकर सुचत नाही. त्यामुळे परफेक्ट मेकअप करायाच्या टिप्स घेतल्या तर तुम्ही ऑफिसमध्येदेखील स्मार्ट आणि सुंदर दिसू शकता.



### सकाळचा मेकअप

सकाळी कार्यक्रम असेल तर नैसर्गिक आणि हलका मेकअप करा. त्यावेळेस शायनी किंवा शिमरचा उपयोग कमी करावा. आयशॅडोही हलक्या रंगाचा वापरावा. ब्लशर जास्त गडद करू नये. लिपस्टिकही मॅटफिनिशची वापरावी.

### संध्याकाळचा मेकअप

हायलायटिंग एरियावर शिमर करावं. इव्हिनिंग मेकअपमध्ये शिमरचा उपयोग केला तरी चालतो. आयशॅडो गडद आणि ग्लिटरबेस्ड करू शकतो. ब्लशर डार्क आणि फेसकट बघून करावं. लिपस्टिकवर लिपग्लॉसही उठून दिसतो.

### मेकअपचे तंत्र

मेकअपसाठी अंडाकृती चेहरा चांगला मानला जातो. जर चेहरा चौकोनी, त्रिकोणी, गोल, हार्ट किंवा डायमंड शेपचा असेल, तर मेकअपमधील काही विशिष्ट प्रॉडक्ट्सच्या साहाय्याने फेस कटिंग करून घ्यावा लागतो.

- चेहरा धुतल्यावर चांगल्याप्रकारे मॉइश्चराइज करा नंतर फाउंडेशन लावा. फाउंडेशन नेहमी ब्रशने लावले पाहिजे, बोटाने ते पूर्ण चेहऱ्यावर सारखे लागत नाही. फाउंडेशन नेहमी गळ्यापर्यंत लावले पाहिजे. नंतर पावडरने मेकअपला फायनल टच द्यायला हवा.
- ऑफिसमध्ये अचानक एखाद्या मीटिंगला जावे लागले तर थोडे टचअप जरुरी असते. त्यासाठी आपल्या पर्समध्ये एक मिनीमेकअप किट नक्कीच ठेवा. त्यात लिप ग्लॉस, ब्लशर, आयशेडो आणि फेस पावडर असायला हवे. शिवाय टी-स्नॅक्स किंवा लंचनंतर थोडी लिपस्टिक लावून पुन्हा फ्रेश दिसू शकता
- मेकअप रिमूव करण्याचाही वेळ नसेल तर तुम्ही त्यालाच रिफ्रेश करू शकता. यासाठी नाइट रिपेयर क्रीमचे काही थेंब हातावर घेऊन चेहऱ्यावर लावा, नंतर फेस पावडर लावा. चेहऱ्यावर डाग , खड्डे असतील त्यांनी फाउंडेशन लावण्यासाठी कन्सीलर लावावे.
- आपला पेहराव आणि वेळ याचा व्यवस्थित विचार करून मेकअप करावा. आपल्या त्वचेच्या रंगानुसार मेकअपच्या शेड्स निवडाव्यात. मेकअप करण्याआधी सर्वप्रथम चेहरा स्वच्छ घ्यावा. नंतर त्वचेनुसार टोनर, मग मॉइश्चरायझर लावा. त्यानंतर फाउंडेशनचा बेस तयार करून घ्या. यानंतर डोळ्यांचा मेकअप करावा. आधी आयशॅडो लावून मग आय-लायनर लावावं. नंतर मस्करा आणि मग ब्लशर लावावा. डोळ्यांना अनुसरून काजळ लावावं. डोळ्यांचा मेकअप झाल्यावर लिपस्टिक लावावी. लिपस्टिक लावताना आउटलाइन करून घ्यावी आणि मग त्यात लिपस्टिक लावावी. त्यानंतर लिपग्लॉस लावावा. सर्वात शेवटी कॉम्पॅक्ट किंवा ट्रान्सलुझन्ट पावडर लावावी.

## दलाई लामा



दलाई लामा म्हणजे तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते होत. चौदावे दलाई लामा तेन्झिन ग्यात्सो सध्याचे दलाई लामा आहेत. चीन ने तिबेट हा देश ताब्यात घेतांना विरोध केल्याने यांनी हिमाचल प्रदेश या राज्यात धरमशाला येथे आश्रय घेतला आहे. तिबेटमध्ये दलाई लामांची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरु झाली. 'दलाई' म्हणजे ज्ञानाचा सागर व 'लामा' म्हणजे तिबेटीयन बुद्धिष्ट गुरु किंवा शिक्षक. पहिले लामा जेनडून द्रूप हे विहाराचे उच्च लामा झाले. 'ड्रेपुंग' हा तिबेटमधील सर्वात भव्य विहार आहे. पहिल्या लामांनंतर प्रत्येक नवा दलाई लामा हा पूर्वीच्या लामाचा अवतार मानला जाऊ लागला.

सध्या दलाई लामा हे तिबेटीय लोकांचे सर्वोच्च धार्मिक नेते व शासन प्रमुख देखील आहेत. इ.स. 1391 ते इ.स. 1933 या कालखंडात तेरा दलाई लामा होऊन गेले. तिबेटीय परंपरेनुसार ज्येष्ठ धर्मगुरु व शासन मिळून नवीन दलाई लामा निवडीची जबाबदारी पार पाडतात.दलाई लामा तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते होत. सध्याचे दलाई लामा आहेत. चौदावे दलाई लामा तेंझिन गियात्सो चीन ने तिबेट हा देश ताब्यात घेतांना विरोध केल्याने यांनी हिमाचल प्रदेश या राज्यात धरमशाला येथे आश्रय घेतला आहे. तिबेटमध्ये दलाई लामांची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरु झाली. 'दलाई' म्हणजे ज्ञानाचा सागर व 'लामा' म्हणजे तिबेटीयन बुद्धिष्ट गुरु किंवा शिक्षक. पहिले लामा जेनडून द्रूप हे विहाराचे उच्च लामा झाले. 'ड्रेपुंग' हा तिबेटमधील सर्वात भव्य विहार आहे.

## गुलामगिरीची सवय नको



एका माणसाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंज-यात ठेवलेल्या पोपटाला चांगले खायलाप्यायला मिळत असे व पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्या मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येई. अखेर एकेदिवशी पोपटाला संधी चालून आली. त्या माणसाने पोपटाला खाणे देण्यासाठी पिंज-याचे दार उघडले होते व त्याच्याहातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंज-याच्या बाहेर निघून गेला. पण लहानपणापासूनच पिंज-यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते. पिंज-यात आयते खायची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन वारा पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरून गेला.

**तात्पर्य** : जास्त काळ पारतंत्र्यात( गुलामगिरीत ) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरुन राहते.

## कविता

### ताई रडू नको !

ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते
तुझे आसू माझ्या गाली,
ओघळती वाटते !
नीज माझ्या मांडीवरी
गातो तुला मी अंगाई
डहाळीची दोन फुले
माझी तुझी एक आई
मीट पाहू डोळे ओले
कापरे की ओठ ते
ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते
किती किती
दिवसांनी तुझी माझी
झाली भेट
जन्म झाल्यापासूनिया
पहातो मी गे तुझी वाट
पुन्हा पुन्हा का ग डोळा
पाणी तुझ्या साठते
ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते !
देतो तुला माझा खेळ
ताई नको गं रागाऊ
चिमणीच्या दातांनी
माझ्यातला देतो खाऊ
पापे देतो गालाचे मी

## प्राण्यांची ओळख

### पांढरा अवाक





कोंबडीपेक्षा मोठा साधारण 75 सें. मी. आकाराचा पांढरा अवाक पक्षी मुख्यत्वे काळ्या आणि पांढऱ्या रंगाचा आहे. याची चोच, डोके आणि मान तसेच पाय काळ्या रंगाचे असून उर्वरीत पक्षी पांढऱ्या रंगाचा आहे. याची चोच लांब आणि बाकदार असते. वीण काळात नराच्या पाठीकडील भाग आणि पंख काळपट करड्या रंगाचे होतात. एरवी नर-मादी दिसायला सारखेच असतात. हे पक्षी पाणथळ भागात थव्याने राहतात.भारतासह नेपाळ, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार, जपान पर्यंत दक्षिण आशियाई देशात पांढरा अवाक पक्ष्याचे वास्तव्य आहे. हे भारतात निवासी आणि स्थानिक स्थलांतर करणारे आहेत. दलदलीचे प्रदेश, सरोवरांच्या भागात आढळणारा हा पक्षी काळा अवाक तसेच बगळ्यांसह राहतो. सकाळ-संध्याकाळ एखाद्या झाडावर सर्व एकत्र जमतात. अशा जागेला सारंगागार म्हणतात.उथळ पाण्यात चोच बुडवून एकट्याने आणि लहान-मोठ्या थव्याने हे पक्षी दिवसभर खाद्य शोधत फिरतात. सरडे, गोगलगाय, बेडुक, मासोळ्या, खेकडे वगैरे पाण्यात राहणारे जीव पांढरा अवाक पक्ष्यांचे खाद्य आहे.

## छोट्यांच्या पाककृती

तुम्हाला सारखी भूक लागलेली असते. ती सुध्दा तुमच्या आवडीच्या पदार्थांची. पण पदार्थांची. पण आई मात्र तुमच्या मनासारखे काही करू देत नाही. खरे आहे ना? मग आपण एक गंमत करू या. तुम्हीच स्वयंपाक घरात शिरून फारशी धडपड न करता काही पदार्थ स्वतःचे स्वतः बनवू शकालात तर? काय म्टलात, जमणार नाही? छे छे अगदी सोपे पदार्थ तुम्हाला बनविता येतील त्यासाठी ते कसे बनवायचे याची साधी सोपी रीत पुढे दिलेली आहे.यात एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची गॅस, मिक्सर काही वापरायचे नाही. सुरी, हात न कापता वापरता येत असेल तर ती वापरायची. थोडीशी पूर्वतयारी आई, ताई किंवा स्वयंपाकाच्या काकूंकडून करून घ्यायची. आणि बाकीचे आपण आपले करून घ्यायचे. चला मग. आपण स्वयंपाक घराकडे आपला मोर्चा वळवू या काहीतरी नवीन करण्यासाठी - आणि आवडीचे पदार्थ खाण्यासाठी !'



### टॉमेटो जिंजर सूप

**साहित्य**


६ मोठे टॉमेटो १ टिस्पून आले, किसलेले १/४ टिस्पून लाल तिखट १/२ टिस्पून सोया सॉस १ टेस्पून पाइनॅपल क्रश चवीपुरते मिठ चवीपुरती साखर १/२ चमचा लिंबू रस

**कृती**

टॉमेटो उकडून घ्यावे. उकडलेले टॉमेटो, साधारण दीड कप पाणी, आले, लाल तिखट, अननस, मिठ, साखर आणि लिंबू रस एकत्र मिक्सरमध्ये बारीक वाटावे. गाळण्यातून गाळून घ्यावे. पातेल्यात घालून एक उकळी काढावी. चव पाहून गरजेचे जिन्नस घालावे. सोया सॉस घालून सूप सर्व्ह करावे.

## दिलेल्या चित्रात रंग भरा





दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# कराड कुटुंबीयातील तिसऱ्या पिढीने जोपासला समर्थपणे वारसा





**जनहित, लोककल्याणकारी अशा विविध वैचारिक आणि चांगल्या विचाराच्या व्यक्तीच्या सहवासात आल्यास निश्चितपणे आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळते. परिसाच्या सहवासात लोखंड आले तरी त्या लोखंडाचे भाग्य उजळून निघते. असाच प्रत्यय शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकिय, सामाजिक आणि अध्यात्मिक या चारही क्षेत्रात मोठे योगदान असलेले विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सहवासात आल्याने अनेकांच्या जीवनाची रेखाच बदलून गेली.**

**चंद्रकांत कातळे, रेणापूर**

प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांचे कार्यकर्तृत्व तासन तास सांगितले तरीही वेळ अपुरा पडेल. कितीही लिहिले तरी कागद कमी पडतील एवढे मोठे कार्य आहे. त्यांच्या भगीनी पूर्णब्रह्मयोगीनी त्यागमूर्ती प्रयागआक्का कराड यांच्या शिकवणीतून जे काही करायचे त्यात इतरांना आधार मिळाला पाहिजे, लोककल्याणाचे कार्य घडले पाहिजे या विचारातून त्यांनी रामेश्वर (रूई) पासून ते संपूर्ण देशभर काम केले. आपल्या निस्वार्थी कार्यपद्धतीने स्वत:चा वेगळा ठसा निर्माण केला. विविध क्षेत्रात दीपस्तंभ प्रमाणे कार्य करणारे प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सहवासातून, प्रेरणेतून अनेकांना नवी दिशा मिळाली. प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांच्यासह जेष्ठ बंधू वारकरी सांप्रदायातील हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड यांनीही प्रयागआक्कांच्या सामाजीक कार्याचा वारसा विविध कार्यातून सातत्याने पुढे घेवून जाण्याचा प्रयत्न केला.

वर्षानुवर्ष अडचणीत, संकटात सापडलेल्या काळ्या आईची सेवा करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करता यावी त्यांच्या डोळ्यातील अश्रूपुसून अल्पसा का होईना आधार देता यावा यासाठी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कराड कुटुंबीयांनी लातूर तालुक्यातील रामेश्वर जवळा परिसरातील ओसाड माळरानावर श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर अँड अँग्रो इंडस्ट्रीजच्या माध्यमातून साखर कारखाना उभा केला. कारखान्याचे चेअरमन श्री. राजेशजी कराड यांनी बारकाईने स्वत:हा लक्ष देवून अत्यंत काटकसरीने नियोजन करून या कारखान्याची उभारणी केली. विजयादशमीच्या दिवशी ऊसाची मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ केला तेंव्हापासून आज तागायत शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाचा अखंड यज्ञ सुरू आहे हे ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खूप दिलासादायक आहे.

साखर कारखाना सुरू झाल्याने स्वत:च्या पोटची खळगी भरण्यासाठी विविध स्वप्न उराशी बाळगून अनेक ऊस तोड कामगाराचे कुटुंब ऊसाच्या फडात ऊस तोडणीच्या कामाला लागले आहेत. जगण्यासाठी काम केल्याशिवाय पर्याय नाही त्याशिवाय लेकरा बाळांचे हित होणार नाही या भावनेतून कामाला आलेल्या ऊसतोड कामगाराच्या जीवनात दिवाळी सण काय? दिवाळी ऊसाच्याच फडात, ईतराप्रमाणे त्यांना सुट्टी नसते, नवे कपडे तर दूरच, गोड धोड करून खाने अवघडच.....

कराड कुटुंबीयात सुन म्हणून आलेल्या सौ. शुभांगी राजेशजी कराड यांनी प्रयागआक्का यांच्याकडून अखंड अन्नदानाचा मिळालेला वारसा आणि प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन ऊसतोड कामगारांच्या कुटुंबीयांना दिवाळीत दिवाळीचा अल्पसा का होईना आनंद देता यावा यासाठी ऊसतोड कामगारांना ज्या ठिकाणी काम सुरू आहे अशा ऊसाच्या फडात जाऊन प्रत्येक कुटुंबीयांना पुरेल एवढा दिवाळीचा फराळ देण्याची संकल्पना मनात आणली. आणि त्या दृष्टीने फराळ तयार करणे असेल त्याची पॅकिंग असेल ही कामे लागलीच आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेवून झपाट्याने त्या करू लागल्या.

ऐन दिवाळीत सणाची लगबग असतानाही श्रीसंत गोपाळबूवा महाराज शुगर अँड अँग्रो इंडस्ट्रीज या साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील ऊस तोडणीच्या कामावर असलेल्या त्या त्या गाव शिवारातील ऊसाच्या फडावर जाऊन कारखान्याचे मुख्य प्रर्वतक हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड, सौ. शुभांगीताई राजेश कराड, रणवीर कराड, बन्सीभाऊ भिसे, गोपाळ पाटील, शाम वाघमारे यांच्यासह इतर अनेककांनी ऊस तोड महिला पूरूष कामगारांची भेट घेवून अस्थेवाइक पणे संवाद साधून चर्चा केली आणि प्रत्येक व्यक्तीस चारकप्याच्या भल्यामोठया स्टीलच्या पॅकिंग केलेल्या डब्बयातून मिठाइचे वाटप केले. सदरील मिठाई मिळताच ऊस तोड कामगारा बरोबराच त्यांच्या सोबत असलेल्या लहान बालकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता. शिवाय पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्या ऊस तोड कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करत असताना सौ. शुभांगीताई कराड यांनाही आत्मिक समाधान मिळत असल्याचे दिसून येत होते.

त्यागमुर्ती प्रयागआक्का कराड आणि प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब वारकरी सांप्रदायातील हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड यांच्याकडून ज्यांचा सण ऊसाच्या फडात, कष्ट करण्यात असतो अशा कुटुंबीयांना दिवाळीचा आनंदही देता यावा ही प्रेरणा सौ. शुभांगीताई राजेश कराड यांच्या मनात यावी यातच खूप काही आहे. प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांच्यामुळे कराड कुटुंबीयातील आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने आवडीनुसार दरवर्षी होणारे उत्सव - सण विविध उपक्रमासह सामाजिक, अध्यात्मिक, शैक्षणिक कार्य करीत आहेत. आध्यात्मिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि वारकरी सांप्रदाय वाढविण्यासाठी रमेशआप्पांनी शेकडो भजनी मंडळांना साहित्याचे वाटप केले.

प्रयागआक्का यांच्या कडून मिळालेला समाजहिताचा वारसा प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांनी पुढच्या पिढीला दिला आणि कराड कुंटूबातील तिसऱ्या पिढीनेही तेवढ्याच सक्षमपणे पुढे चालवण्याचा प्रयत्न करत आहेत. खरंच कराड कुटुंबीयांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. शुभांगी वहिणीच्या ऊसतोड कामगारांना दिलासा देणाऱ्या दिवाळी कार्यक्रमाच्या निमित्ताने कराड कुटुंबीयांच्या हातून सतत समाज हिताची कार्य घडावीत हीच परमेश्वरचरणी प्रार्थना...



# आझाद हिंद सरकार ; स्वातंत्र्यस्वप्नाचे मूर्त रूप

**भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या गौरवशाली इतिहासात २१ ऑक्टोबर १९४३ हा दिवस विशेष महत्वाचा आहे. या दिवशी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सिंगापूरमध्ये 'आझाद हिंद सरकार' स्थापन करून स्वातंत्र्यलढ्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप दिले. हे सरकार केवळ प्रतीकात्मक नव्हते, तर भारतीय जनतेच्या आत्मसन्मानाचा, राष्ट्रभक्तीचा आणि स्वातंत्र्याच्या लालित्याचा स्पष्ट प्रत्यय देत होते. ब्रिटिश सत्तेविरुद्ध हे सरकार उभे राहिले, तसेच भारतीयांच्या मनात स्वातंत्र्य मिळवण्याची नवी ज्वाला पेटवली.**

सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील अद्वितीय नेते होते. देशासाठी त्यांनी जीवनाचे सर्व सुख त्यागून आपले आयुष्य समर्पित केले. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली असतानाही त्यांनी जाणले की अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळवणे पुरेसे नाही. म्हणून त्यांनी सशस्त्र संघर्षाचा मार्ग स्वीकारला. त्यांचा असा विश्वास होता की "स्वातंत्र्य मागून मिळत नाही, ते मिळवावे लागते." या विचारातूनच 'आझाद हिंद फौज' आणि 'आझाद हिंद सरकार'ची निर्मिती झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिशांच्या ताब्यातील भारतीय सैनिक जपानच्या कैदेत गेले होते. सुभाषबाबूंनी या सैनिकांमध्ये देशभक्तीची ज्वाला पेटवून त्यांना स्वातंत्र्यलढ्यासाठी तयार केले. सिंगापूरमध्ये त्यांनी भारतीय सैनिकांना एकत्र करून 'आझाद हिंद फौज' स्थापन केली, जी भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणारी सशस्त्र संघटना ठरली.

२१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूरमध्ये नेताजींनी 'आझाद हिंद सरकार'ची स्थापना करून भारताला ब्रिटिश अधिपत्यातून मुक्त करण्याचा ठोस राजकीय व लष्करी संकल्प मांडला. सरकारचा ध्वज त्रिरंगी होता, मध्यभागी सिंहाचे चिन्ह होते, आणि घोषवाक्य होते ते "जय हिंद!" हे घोषवाक्य पुढे स्वतंत्र भारताचे प्रेरक अभिवादन बनले. या सरकारच्या स्थापनेमुळे भारतीय जनतेत नवी उमेद, धैर्य आणि देशभक्तीची ज्वाला पेटली.

सुभाषबाबूंनी स्वत: 'प्रधानमंत्री' व 'युद्धमंत्री' पद स्वीकारले, तर कॅप्टन लक्ष्मी सहगल यांच्या नेतृत्वाखाली 'राणी झाशी रेजिमेंट' या महिलांच्या फौजेत भारतीय स्त्रियांनीही स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. हे पहिले उदाहरण होते, जेथे स्त्रिया स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय आणि सशस्त्र भूमिकेत उतरल्या. सरकारने चलन, नाणी, मंत्रिमंडळ आणि प्रशासकीय यंत्रणा तयार करून स्वातंत्र्यसत्तेचे वास्तव रूप दिले.

'आझाद हिंद फौज'ने 'चलो दिल्ली!' असा प्रेरणादायी नारा देत म्यानमारमार्गे भारतात प्रवेश केला. इम्फाळ, कोहिमा व अराकान येथील लढाईत आझाद हिंद सेनेने ब्रिटिश सैन्याशी प्रखर संघर्ष केला. जरी शेवटी या लढ्यांमध्ये विजय मिळाला नाही, तरी या संघर्षाने भारतीय जनतेत आत्मविश्वास आणि राष्ट्रभक्तीची ज्वाला पेटवली. ब्रिटिश सैन्यातील भारतीय जवानांच्या मनात स्वातंत्र्याची चेतना वाढली, आणि ब्रिटिश सत्तेविरोधातील असंतोषाची लाट निर्माण झाली.

आझाद हिंद सरकार'ला आंतरराष्ट्रीय पातळीवरही मान्यता मिळाली. जपान, जर्मनी, इटली, म्यानमार, फिलीपिन्स, चीन आणि इतर काही देशांनी या सरकारशी अधिकृत संबंध प्रस्थापित केले. यामुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आणि इंग्रजांना लक्षात आले की भारतीय स्वातंत्र्याची आकांक्षा केवळ स्वप्न नाही, तर ती सत्यात उतरू शकते.



आझाद हिंद सरकारच्या स्थापनेमागील दृष्टिकोन फक्त राजकीय नव्हता; त्यामागे सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता, आर्थिक स्वावलंबन आणि सर्वसमावेशक राष्ट्रवाद यांचा संदेश होता. नेताजींच्या विचारात भारताचा नवजागरणाचा आराखडा होता त्यामध्ये विज्ञान, शिक्षण, उद्योजकता आणि सामाजिक न्याय यावर आधारित एक स्वावलंबी, सशक्त राष्ट्र बनवणे हा उद्देश होता. त्यांनी स्पष्ट केले की स्वातंत्र्य म्हणजे केवळ सत्ता मिळवणे नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक क्रांती देखील साधावी लागते.

सुभाषबाबूंनी सैनिकांना दिलेले प्रसिद्ध वचन "तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन" हे आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात देशभक्तीची ज्वाला पेटवते. त्यांनी दाखवून दिले की स्वातंत्र्य मिळविण्यासाठी केवळ शब्द किंवा घोषणा पुरेशा नसतात; त्यासाठी संघटन, धैर्य आणि प्रामाणिक कृती आवश्यक आहे. त्यांच्या नेतृत्वाने भारतीयांना आत्मविश्वास दिला की भारत स्वतंत्र होऊ शकतो आणि भाताचे भविष्य स्वयंपूर्ण होऊ शकते.

१९४५ मध्ये जपानच्या पराभवानंतर 'आझाद हिंद फौज'चा प्रयत्न निष्फळ ठरला, आणि नेताजींच्या विमान अपघाताच्या बातमीने देश हादरला. परंतु त्यांच्या विचारांचा वारसा आजही जिवंत आहे. १९४५-४६ मध्ये 'आयएनए ट्रायल्स' दरम्यान संपूर्ण भारतात आंदोलने झाली. जनतेने "जय हिंद" आणि "नेताजी अमर राहो" असे घोषणा देऊन ब्रिटिश सत्तेविरोधी तीव्र आंदोलनाची लाट निर्माण केली. अनेक इतिहासकार मान्य करतात की या आंदोलक लाटेमुळेच ब्रिटिशांनी भारतातून माघार घेण्याचा निर्णय घ्यावा लागला.

आज स्वातंत्र्य मिळून आठ दशकांहून अधिक काळ उलटला असला तरी 'आझाद हिंद सरकार'चा इतिहास आपल्याला आजही प्रेरणा देतो. या सरकारने भारतीयांना दाखवून दिले की स्वातंत्र्य ही फक्त सत्ता नसून, ती जबाबदारी, धैर्य, एकता आणि समाजहितासाठी समर्पण यांचा संगम आहे. नेताजींचा संदेश आजही सुसंगत आहे. देशासाठी कार्य करणे, न्यायप्रिय राहणे आणि राष्ट्रहितासाठी स्वत:ला अर्पण करणे म्हणजे खरी स्वातंत्र्याची जाणीव आहे.

२१ ऑक्टोबर हा दिवस फक्त ऐतिहासिक स्मृतिदिन नाही, तर स्वातंत्र्याच्या ज्योतीची ज्वाला पुन्हा प्रज्वलित करण्याचा दिवस आहे. या दिवशी आपण नेताजींच्या त्यागाचे, धैर्याचे आणि देशभक्तीचे स्मरण करतो आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या त्या अमर अध्यायाला अभिवादन करतो ज्याने भारतीयांच्या मनातील स्वाभिमानाची ज्वाला तेजस्वी ठेवली.

'आझाद हिंद सरकार' हा अध्याय इतिहासाचा फक्त भाग नाही; तो भारतीय स्वातंत्र्याच्या आत्म्यात कोरलेली प्रेरणा आहे. आजच्या पिढीने या दिवसाचा अर्थ केवळ भूतकाळात न पाहता, त्यातून प्रेरणा घेऊन राष्ट्रप्रेम, सामाजिक न्याय, स्वावलंबन आणि एकता यांचे मूल्य जपले पाहिजे. नेताजींचा संदेश स्पष्ट आहे तो म्हणजे, स्वातंत्र्य मिळवणे फक्त उद्दिष्ट नसून, ते टिकवणे आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देणे ही खरी जबाबदारी आहे. या दिवशी आपण सर्वजण एकत्र येऊन देशासाठी आणि स्वातंत्र्यासाठी नेताजींच्या मार्गदर्शनात पुढे जाण्याची शपथ घेऊ या.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
*(समाजशास्त्राचे अभ्यासक)*




दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार, दि. 21 ऑक्टोबर 2025




# येणाऱ्या निवडणुकीत रमेशआप्पांच्या नेतृत्वात विरोधकांना चारी मुंड्या चित करणार - ऋषिकेश

## नरवटवाडी येथे भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश कराड यांचा जाहीर सत्कार

**लातूर**





येत्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका लातूर ग्रामीण मतदार संघात ग्रामीण भागाच्या विकासाला गती देणारे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात होणार असून या निवडणुकीत कमळ हेच भाजपाचा उमेदवार आहे, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा चेहरा असून विरोधात ज्यांना कुणाला जिथ जमल तिथं तयारी करावी. आम्ही चारी मुंड्या चित केल्याशिवाय राहणार नाहीत असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे नरवटवाडी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजयुमोचे नूतन जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांचा भाजपाचे नेते जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, चिटणीस दशरथ सरवदे, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद देरेकर, भाजयुमोचे मंडल अध्यक्ष अमर चव्हाण, उत्तम पवार, श्रीकृष्ण जाधव, सरपंच सुकेश शिंदे, कार्यक्रमाचे संयोजक संगायो समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी ऋषिकेशदादा कराड यांचे फटाक्याची आतिषबाजी करत ढोल ताशाच्या गजरात जेसीबीतून फुले उधळून जोरदार स्वागत करण्यात आले.

सत्कार सोहळ्यात बोलताना युवा नेते ऋषिकेश दादा कराड म्हणाले की, गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत केलेल्या कामाची दखल घेऊन भाजपा नेतृत्वाने माझ्यावर युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. पद मिळाल्याने पत मिळत नाही, लातूर ग्रामीण मतदार संघातील तरुणासह सर्वसामान्य जनतेनी माझ्यावर प्रेम करून मला मोठी साथ दिली जिल्हाध्यक्ष पदाच्या लाईक केले हे मी कदापि विसरू शकत नाही. मिळालेल्या पदाच्या माध्यमातून तरुणात पक्षाच्या संघटनात्मक कामाबरोबरच पक्षाला यशाकडे घेऊन जाण्यासाठी जिकरीचे प्रयत्न करणार असून भाजपाच्या विजयाचा गुलाल जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुतळ्यासमोर आपल्या सर्वांना उधळायचा असल्याचे सांगून ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, गडीवरच्या नेत्याला रेणापूरच्या कुस्तीच्या मैदानात जाहीर सांगून विधानसभा निवडणुकीत पराभूत केले. त्यामुळे आता विरोधात कोणीही उमेदवार आला तरी काहीच फरक पडत नाही. लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपा आणि आपले नेते रमेशआप्पा कराड हेच उमेदवार निश्चित करणार आहेत तेव्हा सर्वांनी कमळ हेच उमेदवार समजून आतापासून जिद्दीने जोमाने कामाला लागावे असेही आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र तिरूके म्हणाले की, भाजपाच्या झेंड्याचा युवा मोर्चा हा दांडा असून सामाजिक कार्याचे संस्कार असलेल्या कराड कुटुंबीयातील युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या कार्याची दखल घेऊन योग्य आणि सक्षम निवड पक्षाने केली. कोणतेही पद शोभेची वस्तू नाही. खरे तर जिल्ह्याच्या राजकीय कुरुक्षेत्रातील ऋषिकेश तारा आहे. जिल्हाध्यक्ष पदाची मोठी जबाबदारी असून निश्चितपणे या पदाला न्याय देतील संपूर्ण जिल्ह्यात भाजपाच्या युवक संघटनेचे मजबूत जाळे निर्माण करतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमात नवनाथ भोसले, दशरथ सरवदे, उत्तम पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करून ऋषिकेश कराड यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या प्रारंभी कार्यक्रमाचे संयोजक संगायो समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका विशद केली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दत्तात्रय आंबेकर यांनी आभार मानले.

या सत्कार सोहळ्यास ओम चव्हाण, वैजनाथ लहाने, संजय डोंगरे, विजय चव्हाण, भागवत गीते, अर्जुन कांदे, सुंदर घुले, माधव घुले, बसवराज पाटील, उद्धव केदार, माणिकराव डोंगरे, विलास नागरगोजे, बालाजी केंद्रे, नाथराव गीते, मंचक केंद्रे, दिलीप पाटील यांच्यासह पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील गावा गावातील वाडी वस्तीतील भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार सतीश आंबेकर, व्यंकटराव आघाव, नवनाथ शिंदे, जगन्नाथ आंबेकर, सदाशिव पवार, दत्ता आंबेकर, भाऊसाहेब आंबेकर, संतोष घोडके, प्रल्हाद आघाव, बालाजी आघाव, ज्ञानोबा आंबेकर, गणेश आघाव, महादू आघाव, प्रशांत आघाव, काशिनाथ आंबेकर, गोविंद चिताडे, पांडुरंग आंबेकर, हनुमंत आंबेकर, कल्याण केंद्रे यांच्यासह इतर अनेकांनी स्वागत केले.

# जनिमियाँ कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या जिल्हा सचिवपदी नियुक्ती

## माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान; राष्ट्रवादी काँग्रेसचे काम वाढविण्यसाठी सदैव तत्पर राहणार-जनिमियाँ कुरेशी

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडे यांचे विश्वासू तथा परळी वैजनाथ पंचायत समितीचे माजी उपसभापती व तालुक्यात मोठा जनसंपर्क असलेले माजी उपसभापती जनिमियाँ कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) पक्षाच्या बीड जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यानिवडीबद्दल नवनिर्वाचित जिल्हा सचिव जनिमियाँ कुरेशी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम वाढविण्यसाठी सदैव तत्पर राहणार असल्याची प्रतिक्रिया माजी उपसभापती जनिमियाँ कुरेशी यांनी दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार तसेच प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे, आ.धनंजय मुंडे यांच्या सुचनेनुसार जनिमियाँ कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हा सचिवपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण यांनी पत्राद्वारे नियुक्ती केली आहे. यावेळी माजी आ.संजय दौड, जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, तालुका अध्यक्ष वैजनाथ सौळके, विकास बिडगर, विष्णुपंत सौळके, माऊली गडदे, सुधीर शिंदे, बाबुराव रुपनर व उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले आणि आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. पत्रात म्हणटले आहे की, आपण ही जबाबदारी आदरणीय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विचारानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातुन आपली एकनिष्टता तसेच आपल्या आचरण व विचाराद्वारे समाजात पक्षाच्या पद प्रतिष्ठेची जपवणुक व जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यास आपण अग्रेसर राहाल हीच अपेक्षा. असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.



लोकांच्या सेवेसाठी तत्पर कार्यरत असणार व्यक्तीमत्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बुलंद तोफ तथा परळी वैजनाथ पंचायत समितीचे माजी उपसभापती व तालुक्यात मोठा जनसंपर्क असलेले माजी उपसभापती जनिमियाँ कुरेशी हे सिरसाळा येथील एक प्रसिद्ध व्यापारी म्हणून नावारूपाला आलेले सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेते आहेत. त्यांना या मतदारसंघात ओळखणारा सर्वपरिचित व्यक्तिमत्व आहेत. प्रत्येक गावात आहे प्रत्येक घरात त्यांचे जिव्हाळ्याचे आणि मैत्रीचे संबंध आहेत, तसेच पंचायत समिती सिरसाळा येथून देखील ते निवडून आलेले आहेत आणि त्यानंतर परळी पंचायत समितीचे उपसभापती म्हणून त्यांनी उत्कृष्ट काम केलेले आहे. दोन वेळा सिरसाळा ग्रामपंचायतचे सरपंच होण्याचा बहुमान त्यांनी मिळवलेला आहे. विशेष म्हणजे ते सिरसाळाचे सरपंच असताना सुकळी येथील तुलावातून पाणी आणून सिरसाळा टँकर मुक्त केले. त्यांच्या काळात सिररसाळा येथे उत्कृष्ट कामे झालेली आहेत. सिरसाळा सह परिसरात संपुर्ण दांडगा जनसंपर्क आहे. सर्वांना त्यांचा परिचय असुन त्यांनी भागातील गोर-गरीब व सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला असुन जनतेच्या प्रत्येक समस्येसाठी धावणारे व सामाजीक कार्यात अग्रेसर असतात तसेच आ.धनंजय मुंडे यांचे अत्यंत विश्वासू आहेत. विशेष गावातील संपुर्ण माहिती व जनतेच्या समस्यांच्या अभ्यास आहे. सिरसाळा या जिल्हा परिषद गटामध्ये कुरेशी यांचा मोठा जनसंपर्क आहे. आयुष्यभर एकनिष्ठ नेता संघर्षच त्यांच्या वाट्याला आला. आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील आणि मार्गदर्शनाखाली कुरेशी यांनी राजकीय वलय निमार्ण केले. हालअपेष्ठा, दु:ख, दारिद्रय पाहिल्यानंतर त्यांनी आपल्या इच्छा-आकांक्षावर पाणी ओतून येथील लोकांच्या सेवेसाठी तत्पर कार्यरत असतात. सतत प्रयत्नांची पराकाष्ठा त्यांनी आयुष्यभर केली. सर्वांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. उपसभापती असताना ख-या आर्थाने शासनाच्या विविध योजना वाड्या वसत्यांवर पोहचवल्या. त्यामुळे गावात आले की घरातीलच सदस्यच आल्याची भावना लोकांमध्ये आहे. राष्ट्रवादी पक्षाचे परळी पंचायत समितीचे उपसभापती असताना त्यांनी अनेक विकासकामे केली. पंचायत समिती उपसभापती झाल्यापासून परळी या भागात शेकडो विहिरी मंजूर केल्या.

परळी तालुक्या मधील धनंजयजी मुंडे यांच्या माध्यमातून घरकुल योजनेतून अनेकांना हक्काचे घर मिळाली आहेत. अनेक विकासकामांनी गावेच्या गावे सुंदर होतं आहेत. साहेबांचा हा विकास रथ म्हणजे एक स्वप्नणाती प्रवास आहे.प्रत्येक ठिकाणी स्वत:ची वेगळी ओळख त्यांनी निर्माण केल्याचे दिसते. ही वेगळी औळख निर्माण करण्याचे त्यांचे सामर्थ्य हे जनतेविषयी असणाऱ्या तळमळीतून आल्याचे जाणवते. सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांचं समाजकार्य सुरू आहे. परळीसह संपुर्ण जिल्ह्यात त्यांचा दांडगा संपर्क आहे. पक्षाच्या कामांसह विविध सामाजिक उपक्रमातही त्यांचा सक्रीय सहभाग असतो, त्यांच्या याच कार्याची दखल घेवुन त्यांना आता पक्षाने जिल्हा पातळीवर काम करण्याची संधी दिली आहे. जनिमियाँ कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आला आहे. आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकीत पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार करणे आणि संघटनात्मक बळकटी करणे ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.नवनिर्वाचित बीड सचिव म्हणाले की, माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल पक्षश्रेष्ठींचे मी मन:पूर्वक आभार मानतो. बीड जिल्ह्यात उपमुख्यमंत्री अजितदादा व धनंजयजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट करण्यासाठी मी विविध उपक्रम व संकल्पना राबवणार आहे. पक्षाची ताकद वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहीन." माजी उपसभापती जनिमियाँ कुरेशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हा सचिवपदी निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# चनई येथील महिला बचत गटातील ७०० महिलांना ग्रामनिधीतून १४०० वृक्ष वाटप

## गावातील स्मशानभूमीत १०० वृक्षांची लागवड



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत अंबाजोगाई तालुक्यातील चनई गावात ग्रामनिधीतून महिला बचत गटातील ७०० महिलांना मोफत वृक्ष वाटप करण्यात आले. या उपक्रमातून 'एक महिला – २ वृक्ष' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यात आली. या मधे ८०० केशरआंबा ची व ६०० चिक्कू ची कलम केलेली झाडे महिलाना वाटप करण्यात आली. तसेच गावातील स्मशानभूमध्ये 50 पिंपळाची व 50 वडाची झाडे लागवड केली आहे.


चनई ग्रामपंचायत यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात फळझाडे, औषधी वनस्पती आणि छायादायक झाडांचा समावेश करण्यात आला. प्रत्येक महिलेला तिच्या आवडीनुसार झाडे निवडण्याची संधी देण्यात आली.

या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात सरपंच सौ. रोहिणी प्रभाकर सावरे, उपसरपंच श्री. अनिल शिंदे ग्रामसेवक श्री. लक्ष्मण देशमाने तसेच बचत गटांच्या प्रमुख महिला उपस्थित होत्या. सरपंचांनी आपल्या भाषणात सांगितले की, "महिलांचा सहभाग हा पर्यावरण रक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. ही झाडे फक्त लावायची नाहीत, तर त्यांचे संगोपन करून ते विकसित करणे, ही जबाबदारी आपण सर्वांनी स्वीकारली पाहिजे."

महिलांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांनी वृक्षारोपणाबाबत आपल्या जबाबदाऱ्या स्विकारत, झाडांचे पालनपोषण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

ग्राम निधीचा उपयोग करून समाजाभिमुख आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्याचे चनई ग्रामपंचायतीचे प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी ठरत आहेत.





# मा. मंत्री. बाळासाहेब थोरात, पद्मश्री साहेब जे. आर पवार साहेबांचा सेवानिवृत्ती सोहळ्यासाठी, मोठ्या संख्येने उपस्थित रहा - प्रदिप थोरवे

**कडा प्रतिनिधी**

सहकार, शिक्षण, राजकारण, समाजकारनातील दांडगा अभ्यास, कामावरील निष्ठा, आरोग्यदूत, दानशूर म्हणून ओळखले जाणारे सामाजिक बांधिलकी हेच ब्रीद जपणारे मा. श्री. जे आर पवार साहेब, शासकीय तलाठीची नोकरी सोडून सुरवातीला कडा कारखाना आणि नंतर त्यांनी 38 वर्ष श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे मैनेजिंग डायरेक्टर म्हणून त्यांनी काम पाहिले व दादा पाटील राजळे महाविद्यालय ची संचालक पदाची धुरा देखील सांभाळली.

एकूण ४८ वर्ष सेवा करून वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना ली. येथून मैनेजिंग डायरेक्टर पदावरून ते निवृत्त होत आहेत. त्यांचा सेवापूर्ती सोहळा मा. मंत्री. बाळासाहेब थोरात साहेब, मा. पद्मश्री. पोपटराव पवार साहेब (हिवरेबाजार), मा.खा.बजरंग बप्पा सोनवणे, मा. आ. मोनिकाताई राजळे,

मा. आ. सुरेश (आण्णा) धस, मा. आ भीमराव धोंडे साहेब, मा. आ. साहेबराव (नाना) दरेकर, मा. आ बाळासाहेब (काका) आजबे, डॉ. एस बी निमसे साहेब (कुलगुरू) आणि बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील साहेबांवर प्रेम करणाऱ्या तमाम मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या गावी पांडुरंग मंगल कार्यालय, पिंपळा ता-आष्टी, जि.बीड येथे दिनांक २४/१०/२०२५ रोजी सकाळी १० वाजता संपन्न होणार आहे,तरी आपण सर्वानी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित राहावे अशी विनंती पवार साहेबांचे भाचे प्रदिप थोरवे यांनी केली आहे.